## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यातील १४ महाविद्यालयांमध्ये बहिणाबाई अभ्यासिकांना प्रारंभ होत असून पैकी चार अभ्यासिका सुरू झाल्या आहेत तर येत्या आठवडाभरात उर्वरीत सुरू होत आहेत. विद्यापीठाने अत्यंत अभिनव अशी ही योजना विद्यार्थ्यांसाठी सुरू केली आहे.

विद्यापीठाने सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात बहिणाबाई अभ्यासिका सुरू करण्याची योजना मांडली होती. ग्रामपंचायत/नगरपंचायत हद्दीतील महाविद्यालयांमध्ये ही अभ्यासिका सुरू केली जावी अशी विद्यापीठाने कल्पना मांडली. महाविद्यालयातील ग्रामीण, आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा व प्रशासकीय सेवांमध्ये संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने परीक्षेच्या पूर्वतयारीकरीता आवश्यक असणा-या बाबींचा विचार करून महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र वाचन कक्षाची निर्मिती करण्यात यावी आणि त्या कक्षाला बहिणाबाई अभ्यासिका हे नाव देण्यात यावे असे विद्यापीठ अधिकार मंडळाने ठरवले. त्यासाठी विद्यार्थी विकास विभागाने महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागवले होते.

एकुण ३० प्रस्ताव विद्यापीठाला प्राप्त झाले. नियमावलीनुसार १४ महाविद्यालयांची निवड करण्यात आली. त्यामध्ये १) त्रिमुर्ती इन्स्टिट्यूट फॉर्मसी पाळधी, जळगाव,२) श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर, ३) गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी, ४) कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद, ५) प. रा. हायस्कुल सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव, ६) सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालय, ऐनपूर, ७) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कु-हा-काकोडा, ता. मुक्ताईनगर, ८) उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल, ९) वाडीले महाविद्यालय थाळनेर, ता. शिरपूर, १०) देवरे महाविद्यालय म्हसदी, ता. साक्री, ११) गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगांव, धुळे, १२) साईबाबा भक्त मंडळ संचलित कला महाविद्यालय म्हसावद, ता. शहादा, १३) रूरल फाउंडेशन संचलित वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय, अक्कलकुवा, १४) लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालय विसरवाडी, ता. नवापूर यांचा समावेश आहे.

विद्यापीठाकडून या अभ्यासिकेसाठी एका महाविद्यालयास दरमहा ५ हजार याप्रमाणे वर्षाकाठी ६० हजार रूपये अनुदान दिले जाणार आहे. या अभ्यासिकेत महाविद्यालयाकडे स्पर्धा परीक्षांची पुरेशी पुस्तके, मासिके आणि वृत्तपत्रे उपलब्ध असणे गरजेचे आहे. अभ्यासिकेची वेळ सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत असेल. विद्यार्थ्यांसाठी पुरेशे फर्निचर, आवश्यक पंखे, बेंच/टेबल खुर्ची, वीज पुरवठा, स्वच्छ पिण्याचे पाणी असणे गरजेचे आहे. महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत विनामुल्य प्रवेश राहील. महाविद्यालया बाहेरील विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेत प्रवेश हवा असल्यास नाममात्र शुल्क घेवून प्रवेश देण्याचा निर्णय महाविद्यालय आपल्या स्तरावर घेवू शकते. विद्यार्थ्यांचे उपस्थितीपत्रक देखील त्या ठिकाणी ठेवले जाईल.

दरम्यान श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर आणि गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी येथील अभ्यासिकांचे उद्घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते झाले. व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे हे उपस्थित होते. शेंदुर्णी येथील कार्यक्रमास प्राचार्य सांळुखे उपस्थित होते तर खडसे महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमास श्रीमती रोहिणी खडसे, प्राचार्य हेमंत महाजन, सिनेट सदस्य दिनेश चव्हाण उपस्थित होते. गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगांव येथील अभ्यासिकेचे उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य एस. आर. पाटील, सिनेट सदस्य नितीन ठाकुर, प्राचार्य के. बी. पाटील उपस्थित होते.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. २५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत युजीसी – मानव संसाधन विकास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहका-याने ऑनलाईन रिफ्रेशर कार्यक्रमाला प्रारंभ झाला आहे.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, पुणे विद्यापीठाच्या केंद्राचे संचालक प्रा. सुभाष केंद्रे, प्रशाळेचे संचालक प्रा. मधुलिका सोनवणे, या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार यांची उपस्थिती होती. महाराष्ट्रासह गोवा, गुजरात, कर्नाटक या राज्यातील २५ प्राध्यापक या ऑनलाईन रिफ्रेशर कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. दि. ४ डिसेंबर पर्यंत हा ऑनलाईन रिफ्रेशर कार्यक्रम सुरू राहणार आहे.

.....................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २५ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी